"जिल्हा निर्यात प्रचालन परिषद समिती" सभा दिनांक ९ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता

सभागृह क्रमांक ०१ जिल्हाधिकारी **कार्यालय** ,अमरावती

# सभेचे ईतिवृत्त

**मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दिनांक ०९/०९/२०२१ चे ईतिवृत्त व त्यावर केलेली कार्यवाही जिल्हा उदयोग केंद्र,अमरावती**

| संबंधित विभाग/अधिकारी/कर्मचारी यांनी विषयानूसार सांगीतलेली माहीती | अ.क्र. | मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेले निर्देश | विषयाच्या कार्यवाहीची सदयस्थिती |
|---|---|---|---|
| १. देशाच्या एकूण निर्यातीमध्ये राज्याचा वाटा वाढविण्यासाठी राज्यातील लघू व मध्यम उदयोगांना आंतरराष्टीय व्यापारामध्ये सहाय्य व तसेच राज्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी आणि निर्यातदारांमध्ये जागरूकता आणून त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी तसेच राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने तसंच उदयोजकांना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी | १ | निर्यात साठा किती आहे याचे नियोजन करावे. | महाराष्ट शासनाने प्रत्येक जिल्हयाचा Action Plan तयार करण्याकरिता EY consultancy यांना काम दिलेले आहे.या कंपनीचे श्री.अंकीत गुप्ता यांनी Action Plan चे सादरीकरण दाखविले. तथापि अदयापपर्यंत उपलब्ध साठा किंवा किती निर्यात होते याबाबतची माहीती त्यांच्या आराखडयामध्ये उपलब्ध झालेली नाही. |
| | २ | उपलब्ध वाहतूक कोणत्या प्रकारची आहे.रेल्वे,वाहतूक असल्यास किती प्रमाणात आपल्याला उपलब्ध होऊ शकेल.निर्यात विषयक अहवाल तयार करावा. | याबाबत EY कंपनीने माहीती प्राप्त करावी अशा सुचना अध्यक्षांनी दिल्या. |
| | ३ | महाराष्ट्र सरकार कडून ज्या अनुषंगीक बाबी आहे त्यावर Subsidy उपलब्ध करून देण्यात यावी. | महाराष्ट शासनाचे निर्यात धोरण अंमलात येणार आहे.त्याचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू आहे.अशी माहीती महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र, यांनी दिली. |
| | ४ | राज्याअंतर्गत भागधारक,शासकीय यंत्रणा आणि आंतरराष्टीय संस्था बरोबर समन्वय साधने. | भारत सरकारच्या वाणिज्य विभागामार्फत दिनांक २० सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२१ रोजी केंद्र शासनाच्या DGFT विभागाच्या समन्वयाने Exporters conclaves आयोजित करण्यात येणार आहे अशी माहीती महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र, यांनी दिली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २. जिल्हयातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये,औदयोगिक संघटना , निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ.यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करत आहोत. राज्य शासनाच्या या निर्णयाची कशी जास्तीत जास्त अंमलबजावणी होईल यासाठी प्रयत्न करत आहोत. | ५ | निर्यात प्रचालनासाठी राज्यात आराखडा तयार करणे. | EY मार्फत आराखडा तयार करण्यात येत आहे. |
| | | ६ | शहरी ग्रामीण जास्तीत जास्त उदयोजकांना निर्यातीबाबत माहीती पुरविणे आणि त्यांच्या अडीअडचणींचे ,तक्रारीचे निराकरण करणे. | दिनांक २४/०९/२०२१ रोजी Exporters Conclaves आयोजित करण्यात येत आहे.त्यात उदयोजक,फार्मर्स गृप,शेतकरी यांना बोलावण्यात आले आहे. |
| | | ७ | लघू उदयोग व कुटीर उदयोग यांना या योजनांमध्ये समाविष्ट करावे.वेळोवेळी त्यांच्याशी संपर्क साधून किंवा भेटी घेऊन त्यांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहीत करणे. | मा.अध्यक्ष यांनी सुचित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| | | ८ | आपल्या विभागाचा डेटा बेस बनवून घ्या आणि काही अडचणी असल्यास त्यावर सल्लामसलत करा. | जिल्हयातील निर्यातीचा डाटा अदयापपर्यंत उपलब्ध झालेला नसून सहजासहजी मिळत नसल्याचे महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र, यांनी सांगितले. यावर सभेला उपस्थित उदयोजकांनी आपली निर्यातीबाबतची माहीती उपलब्ध करून दयावी अशी सुचना मा.अध्यक्ष यांनी दिली. तसेच शासकीय विभागाकडून सुध्दा हि माहीती घ्यावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचविले. |
| | | ९ | उदयोग निहाय उदयोजकांचा डेटा तयार करणे | सदर माहीती प्राप्त करून घेण्यात येत आहे असे श्री अंकीत गुप्ता यांनी सांगितले. |
| | | १० | नविन enterpreneur ला संधी दया व त्यांचा निर्यात वृध्दी साठी प्रेरित करा. | महाराष्ट्र शासनाचे नविन धोरणामध्ये सदर बाबीचा अंतर्भाव असणार आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ११ | मा. अध्यक्ष यांनी सुचविलेल्या ईतर बाबी. | १. निर्यात करणा-या उत्पादकांसाठी बँकेकडून काही सुविधा, योजना आहेत काय. २. क्षेत्रिय स्तरावर कृषि सहायक, ग्रामसेवक यांचे मार्फत गावस्तरावरील उदयोगांना भेटी देऊन निर्यातक्षम उदयोगांची माहीती घ्यावी. ३.MIDC असोशिएशनच्या कार्यालयात उदयोजकांची बैठक घ्यावी.४.उदयोजकांकडे निर्यातसाठी किती potential आहे, ते किती उत्पादन निर्यात करू ईच्छीतात.५. श्री अंकीत गुप्ता C.A. यांना ओळखपत्र दयावे जेणेकरून ते सर्व विभागाकडून माहीती घेऊ शकतील. |

सभेचे शेवटी महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानुन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**महाव्यवस्थापक**
**जिल्हा उदयोग केंद्र, अमरावती.**